# प्रकरण – 4
# नियमावली – 3
# निर्णय प्रक्रियेची पध्दती

व्यवस्थापक / सहाय्यक व्यवस्थापक ह्यांच्यामार्फत प्रस्ताव तयार करण्यात येतात व ते विविध यंत्रणांतर्फे म्हणजेच प्रमुख लेखापाल (वित्तीय बाबीं संबंधित), नगर अभियंता (उभारणी, पुनर्स्थापना आणि व्यापक दुरुस्ती इ. संबंधात), विधी अधिकारी (कायदेशीर बाबी संबंधित) म.न.पा. उपायुक्त/सह आयुक्त, अतिरिक्त आयुक्त / आयुक्त ह्यांना विषयवार व बाबीचे गांभीर्य पाहून मंजूरीसाठी सादर करण्यात येतात.

सक्षम प्राधिका-यांचे निर्णय सदस्यांना / जनतेस, व्यवस्थापक / सहाय्यक व्यवस्थापक आणि अथवा मनपा उपायुक्त ह्यांच्या मार्फत कळविण्यात येतात.

## विविध स्तरांवरील कार्यालये पुढील प्रमाणे आहेत-

1. वित्तीय बाबींसाठी संबंधित विभागातील लेखा अधिकारी
2. किरकोळ दुरुस्तीच्या बाबीसंबधित उपाययोजना करण्यासंबंधित बाबींसाठी नगर उप अभियंता (परिरक्षण).
3. जलतरणतलाव उभारणीच्या पुनर्दुरुस्ती / व्यापक दुरुस्ती संबंधित बाबीसाठी नगर उप अभियंता (नियोजन व संकल्पचित्रे).
4. तरणतलाव आणि गाळणी संयंत्र ह्यांची विद्‌युत विषयक उभारणी संबंधितील समस्यांबाबत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्‌युत).